MHKO070014822019

<u>नियमित दिवाणी दावा क्रं.१३४/२०१९ मधील नि.क्र.५ वरील आदेश.</u>

**०१.** वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा निशाणी ५ वरील अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम (१) व (२) तसेच कलम १५१ अन्वये दाखल करुन असे कथन केले आहे की,

**०२.** मौजे कोंडीग्रे ग्रामपंचायत हद्दीतील गट नं.३३८ असून क्षेत्र हे ३.०३ आकार रु.८.२५ पै. यापैकी क्षेत्र ०.६१ आर, आकार रु.०.६२ पैसे यापैकी हे.०.२१ आर. (यामध्ये हे ०.०२ आर विहीर व विहीर पडक्षेत्र) ची जमिन तदंगभुत वस्तुसह व इजमेंटच्या सर्व हक्कासह यांसी चतुःसिमा– पूर्वेस – याच गट नंबरपैकी उर्वरित जमिन, पश्चिम–याच गट नंबरपैकी उर्वरित जमिन, दक्षिण– श्री.सिताराम काशीबा दुधाळे यांची जमिन व उत्तरेस– श्री.बहादुर भुपाल कांबळे याची जमिन येणे प्रमाणे मिळकत ही दाव्याचा विषय असून (सोयिस्करतेसाठी वर नमुद मिळकतीस “दावा मिळकत” असे संबोधण्यात आलेले आहे.)

**०३.** यातील प्रतिवादी क्रं.१ व २ हे वादीचे आई वडील असून प्रतिवादी क्रं.३ हा वादीचा सख्खा भाऊ आहे. प्रतिवादी क्रं.३ हा काही कामधंदा करीत नसुन विनाकारण वादी क्रं.१ व त्याच्या पत्नीबरोबर वाद करीत असल्याने वादी क्रं.१ हे त्याच्या कुटूबांसह गेले १० वर्षापासुन निमशिरगाव येथे मिळकत क्रं.८५० मध्ये स्वतःच्या खर्चाने घर बांधुन रहात असुन केळी विकून आपला उदरनिर्वाह करित आहेत. तर प्रतिवादी क्रं.३ हे निमशिरगाव येथील सि.स.नं.८४६ वरील मिळकतीत राहणेस असून सदर घरामधील एका खोलीचा खर्च वादी क्र.१ यांनी केलेला आहे. यातील प्रतिवादी क्रं.३ यांना सुनिल व स्वप्नील ही दोन मुले असल्याने प्रतिवादी क्र.१ यांच्या नावे असलेल्या वडिलोपार्जित मिळकतीमधील २/३ हिस्सा त्यांना मिळावा म्हणुन त्यांचा आग्रह होता. परंतू वादी आईवडील व इतर नातेवाईक यांनी अशाप्रकारची मागणी चुकीची असून रितीरिवाजाप्रमाणे तसेच कायदयाप्रमाणे हिस्सा मिळेल असे प्रतिवादी क्रं.३ यांना सांगितले होते. त्यामुळे प्रतिवादी क्रं.३ व त्याची मुले ही वादी क्रं.१ व त्यांचे कुंटूबीयाशी विनाकारण भांडण तंटा करीत होते. त्याबाबतच्या तक्रारी हया निमशिरगाव ग्रामपंचायत, तंटामुक्ती कमिटी, पोलिस स्टेशन, महसुली कार्यालय वगैरे याचेकडे झालेल्या आहेत.

०४. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीमधील विहीर खुदाईच्या कामासाठी वादी क्र.१ यांनी विहीर खुदाई करणार श्री.नाना पांडू राठोड यांना इसारापोटी रक्कम रुपये ४५,०००/– दिलेले आहेत. तसेच विहीरीचे खुदाई कामकाजावेळी प्रतिवादी क्र.१ यांचे जवळ रु.५०,०००/– देवून खुदाईमधुन निघणा–या मुरुम विक्री रकमेतुन श्री. नाना पांडू राठोड यांची राहीलेली रक्कम भागवावी असे सांगितले. परंतू मुरुम विक्री रक्कम व विहीर खुदाईचा होणारा खर्च भागविणेवरुन प्रतिवादी क्र.३ व त्यांची मुले हे वाद– विवाद करु लागले. त्याचबरोबर प्रतिवादी क्रं.१ यांचे नावे असलेली वडिलार्जित दावा मिळकतीमधील तसेच विहीरीमधील हक्क हा २/३ प्रमाणात मिळावा म्हणून पुन्हा भांडण करुन वाटण्या कराव्यात असे वांरवार तगादा सुरु ठेवलेला होता. दावा मिळकतीसह इतर मिळकती ही वादी – प्रतिवादी यांची वडिलार्जित मिळकती असून त्याचे अदयाप सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. मात्र सदरच्या मिळकती हया प्रतिवादी क्रं.१ यांचे नावे असल्याचा व त्याचे वयोमानाचा तसेच अडाणीपणाचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्रं.३ व त्यांचे कुटूंबिय अगर इतर कोणीही त्याचे नावे असलेली दावा मिळकतीसह इतर मिळकतीबाबत अपरोक्ष करार–मदार होवू नयेत म्हणून यातील वादी क्रं.१ यांनी दि.२४/६/२०१८ रोजी ॲडव्होकेट श्री.एस.डी.जगदाळे यांचेमार्फत दै.सकाळ मध्ये जाहिर नोटीस देऊन गट क्रं.३३८ बाबत प्रतिवादी क्र.१ यांचेबरोबर हस्तांतरणाचे दस्त अगर करार, कर्जबोजा वगैरे केलेस ते बंधनकारक राहणार नाहीत असे कळविणेत आलेले आहे.

०५. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रं.३ व त्याचे कुटूंबियानी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून दिनांक १५/०४/२०१९ रोजी गट क्रं.३३८ मधील ०.२१ आर. क्षेत्र (विहीर, पडक्षेत्रासह) हे रजिस्टर दस्ताने खरेदी केलेले आहे. सदरचा खरेदी दस्त वादी यांच्या संमतीशिवाय तसेच दावा मिळकतीच्या सहहिस्सेदारांची कोणतीही संमती न घेता व विनामोबदला पोकळ स्वरुपाचा आहे. त्याबाबत वादी यांनी प्रतिवादी क्रं.३ यांना विचारले असता त्यांनी त्यास दाद दिलेली नाही उलट दादागिरीची भाषा बोलुन खरेदी दस्तामधील क्षेत्र ताब्यात घेणार आहे, मला कोणीही आडवू शकत नाही, माझे वाटेला गेल्यास त्याला जिवंत ठेवणार नाही अशी दमदाटीची भाषा केली. वादींनी प्रतिवादी क्रं.१ यांना सदर खरेदी पत्राबाबत विचारले असता त्यांनी त्याबाबत काहीही आठवत नसल्याचे तसेच मोबदला रक्कम घेतली नसल्याचे बोलुन दाखविले आहे. तसेच प्रतिवादी क्रं.२ यांनीही त्यांना काही माहीत नसल्याचे सांगून प्रतिवादी क्रं.३ व त्यांची पत्नी व मुले दबाव आणत आहेत असे सांगितलेले आहे. वादी क्रं.१ यांनी मा.तलाठी कार्यालय, मौजे– कोंडीग्रे यांचेकडे सदरचा दस्त हा बेकायदेशीर असल्याने सदर खरेदी दस्ताआधारे होणा–या फेरफार नं.५२९१ ला हरकत/तक्रार अर्ज दिलेला आहे. तसेच मा.तहसिलदारसो, शिरोळ व मा.मंडल अधिकारी, भाग

नांदणी यांचेकडील दि.२/७/२०१९ रोजी तक्रार अर्ज दिलेले आहेत. प्रतिवादी क्रं.३ दस्तामधील क्षेत्र हे ताब्यात घेणार आहे असे बोलुन दाखवून त्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे वादी यांचे कायदेशीर हिस्सेवर गदा येणार असून उत्पन्नाचे क्षेत्र कमी होणार असलेने सदरहू खरेदीदस्त बेकायदेशीर असलेचे व तो रद्दबातल होवून मिळणेसाठी वादी यांना प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. दाव्याचा निर्णय होणेस बराच कालावधी लागणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असुन प्रतिवादी क्रं.१ व ३ यांचेमध्ये दावा मिळकतीमधील हे.०.२१ आर बाबत मा.दुय्यम निबंधक, शिरोळ यांचे कार्यालयात झालेला खरेदी दस्त नं.१८९३/२०१९ आधारे पुढील हस्तांतरण, हक्क, तारण, कर्जबोजा वगैरे करु नये म्हणून प्रतिवादी क्रं.३ व तर्फे इसमाना कायम मनाई आदेश करण्याबाबत विनंती केली आहे.

०६. प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे प्रस्तुत प्रकरणी हजर होवुन वादीच्या दाव्यास कैफियत व प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे (नि.क्रं.१२) वर दाखल करुन प्रस्तुत अर्जातील कथने खोटी व लबाडीची असून ती स्पष्टपणे नाकारलेली असुन असे कथन केले आहे की, वादी क्रं.२ ही प्रतिवादी यांची मुलगी आहे व तिचा विवाह अंदाजे ३० वर्षापूर्वी झालेला आहे. प्रतिवादी क्रं.१ हे त्याचे वडिल असुन ते जिवंत असल्याने त्यांना कोणतीही दाद मागण्याचा कायदेशीर अधिकार नाही. दावा मिळकत ही प्रतिवादी क्रं.३ यांनी प्रतिवादी क्रं.१ यांच्याकडून खरेदी केलेली असल्याने दावा मिळकतीशी वादी यांचा काही एक संबध राहीलेला नाही. दावा मिळकत ही सध्या प्रतिवादी क्रं.३ यांच्या मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस आहे. त्याचबरोबर ग्रामपंचायत असेसमेंट उतारा नं.८५० ही मिळकत प्रतिवादी क्रं.१ यांचे नांवे नोंद आहे. निमशिरगाव येथील सि.स.नं.८५४ ही मिळकत प्रतिवादी क्रं.३ यांची स्वकष्टार्जित मालकीची मिळकत असून त्यामध्ये तीन खोल्या या प्रतिवादी क्रं.३ यांनी स्वखर्चाने बांधलेल्या आहेत. त्या मिळकतींशी वादी याचा कसलाही संबध नाही. सदरची मिळकत तारण देवून प्रस्तुत प्रतिवादी क्र.३ यांनी रेंदाळ सहकार बॅक लि. रेंदाळ, शाखा इचलकरंजी यांच्याकडून कर्ज काढून सदर कर्जाची रक्कम दावा मिळकतीमध्ये विहीर काढणेसाठी वापरणेत आली आहे. यातील वादी क्र.१ व त्याची पत्नी, त्यांचा मुलगा अमोल हे भांडखोरवृत्तीचे असून मिळकतीसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांना नाहक त्रास देत आहेत. तसेच वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द ब–याचवेळा पोलिस स्टेशनमध्ये खोटया तक्रारी दिलेल्या आहेत व तसेच यातील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी देखील वादी क्र.१ व त्यांचा मुलगा अमोल याचेविरुध्द तक्रारी दिलेल्या आहे. त्याचबरोबर यातील वादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.१ हे त्याचे वडिल असताना त्यांना मारहाण करुन त्यांचे कुटूंबातील लोकांनी मोठया प्रमाणावर शारिरीक व मानसिक त्रास दिलेला आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी कदापिही गट नं.३३८ मधील ०.६१ आर क्षेत्रामधील २/३ हिस्सा मिळावा म्हणून अग्रह

धरलेला नव्हता व नाही. वास्तविक वादी हेच संपूर्ण मिळकत कशाप्रकारे हडप करता येईल याचा प्रयत्न करीत होते. वादी यांनी दावा मिळकत म्हणून गट नं.३३८ मधील ०.२१ आर क्षेत्राची मिळकत नमुद केलेली आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र.१ यांच्या मालकीची गट नं.३३८ मधील ०.६१ गुंठे जमिन होते व त्या मिळकतीमध्ये होणारी पाणी टंचाई टाळणेसाठी विहीर खुदाईचे काम हे यातील प्रतिवादी क्र.३ यांच्या खर्चाने काढलेली आहे.

०७. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी कायदेशीर मार्गाने दावा मिळकत दि.१५/४/२०१९ रोजी प्रस्तुत प्रतिवादी क्रं.३ यांना रक्कम रु.२,००,०००/- या रकमेस विक्री केलेली आहे व सदर रक्कम रुपये दोन लाख ही प्रतिवादी क्र.१ यांना मिळालेली आहे. त्याबाबत प्रतिवादी क्र.१ यांची काही एक तक्रार नाही. मुळ पुरुष बाळा चौगुले यांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये सरसनिरस मानाने वाटप होवून दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ यांना मिळालेली असून ते दावा मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत व त्यांनी कायदेशीर गरजेसाठी दावा मिळकतीची विक्री केली आहे. तसेच गट नं.३३८ मध्ये अद्याप क्षेत्र शिल्लक असल्याने वादी यांना तक्रार करण्याचा कोणताही अधिकार नाही. वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये वाटणीची दाद का मागणी केलेली नाही याचा कोठेही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे वादीस प्रथमदर्शनी केस नाही, मनाई अर्ज मंजूर झालेस प्रतिवादीचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०८. अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुचे विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यांना मी माझी कारणांसहित उत्तरे यापुढे नमूद करतो आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1 | वादीं प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | होय. |
| 2 | सोयीस्करतेचा तुला वादींच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात काय ? | होय. |
| 3 | मागणी केल्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतात काय ?य | होय. |
| 4 | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रं.१ ते ४ करीता –

**०९.** सर्वप्रथम हे नमुद करणे आवश्यक आहे की, मनाई हुकूमाची मागणी करणारी व्यक्ती ही स्वच्छ हाताने व स्वच्छ हेतुने आली आहे काय, तसेच त्याने जागृतपणे आपल्या हक्काचे रक्षण करण्यासाठी योग्य वेळेत अर्ज दाखल केला आहे काय हे देखील पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी क्रं.३ यांच्या वडिलांच्या मालकीची म्हणजेच प्रतिवादी क्रं.१ यांच्या मालकीची असल्याची बाब वादांकित नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्रं.३ यांच्या हक्कात दावा मिळकतीचे खरेदीखत करुन दिल्याची बाब सुध्दा वादांकित नाही.

**१०.** वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादी व प्रतिवादीमधील नातेसंबध हे प्रतिवादी यांस मान्य आहेत. तसेच प्रतिवादी यांनी दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जीत असल्याची बाब नाकारलेली नाही. गट नं.३३८ मध्ये वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये आजपर्यत सरस–निरस मानाने वाटप झालेली नसताना प्रतिवादी क्रं.१ यांनी सदरील गट नं.३३८ मधील काही क्षेत्राचे म्हणजेच दावा मिळकतीचे खरेदीपत्र हे चतुःसिमा पूर्वक करुन दिलेले आहे. वास्तविक गट नं.३३८ मध्ये अद्याप वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाटप होणे बाकी असून प्रतिवादी क्रं.१ यांच्या हिश्यास गट नं.३३८ मधील नक्की किती क्षेत्र येईल हे निश्चित नसताना प्रतिवादी क्रं.१ यांनी प्रतिवादी क्रं.३ यांच्या हक्कात दावा मिळकतीचे दि.१५/४/२०१९ रोजी दस्त करुन दिलेले आहे ते पोकळीस्त स्वरुपाचे आहे. तसेच वादी क्रं.२ यांचा गट नं.३३८ मध्ये वडिलोपार्जीत मिळकतीत हिस्सा असताना त्याबाबत त्यांनी त्यांच्या हिश्याचे कोणतेही हक्कसोडपत्र करुन दिलेले नसताना प्रतिवादी हे वादी क्रं.२ यांचा गट नं.३३८ मध्ये हिस्सा नसल्याचे खोटे व चुकीचे कथन प्रतिवादी करीत आहेत. सबब सदर सर्व बाबीचा विचार करता प्रतिवादी क्रं.१ यांनी प्रतिवादी क्रं.३ यांना करुन दिलेल्या खरेदीपत्रामधील मिळकतीचे प्रतिवादी क्रं.३ यांनी हस्तांतरण, बोजा तारण करु नये अशाप्रकारची तुर्तातूर्त मनाईचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

**११.** प्रतिवादी तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा केवळ हक्कज्ञापन व मनाईसाठी दाखल केलेला आहे. गट नं.३३८ याचे क्षेत्र ०.६१ आर असताना वादी यांनी दावा मिळकत म्हणून केवळ ०.२१ आर क्षेत्र दाखविलेले आहे. तसेच वादी यांनी उर्वरित ०.४० आर बाबत प्रस्तुत दाव्यात कोणतीही दाद मागितलेली नाही. तसेच दाव्यामध्ये दावा मिळकत

०.२१ आर च्या ज्या चतुःसिमा नमुद केलेल्या आहेत त्या गट नं.३३८ च्या क्षेत्र ०.६१ आर यांच्या दिलेल्या आहेत. त्यामुळे दावा मिळकतीच्या चतुःसिमा चुकीच्या आहेत. दि.१५/४/२०१९ च्या खरेदीपत्राबाबत प्रतिवादी क्रं.१ व ३ याच्यामध्ये वाद नसून प्रतिवादी क्र.१ यास सदरचे खरेदीपत्र मान्य असल्याने त्याबाबत हरकत घेण्याचा वादी यास हक्क व अधिकार नाही. तसेच वादी यांनी प्रस्तुत दाव्यात वाटपाची दाद मागितलेली नाही. प्रतिवादी क्रं.३ यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून त्यांचा केवळ शेती हाच उपजिविकेचा व्यवसाय आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं.३ हे दावा मिळकत विकणार नाही मात्र सदर जमिन कसत असताना पिक मशागतीसाठी प्रतिवादी क्र.३ यांना कर्ज काढावे लागणार आहे. सबब, या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

**१२.** एकंदरीत वादी व प्रतिवादी यांची कथने तसेच युक्तीवाद पाहता गट न.३३८ ही मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित असल्याची तसेच दावा मिळकत ही सदरहू गट न. ३३८ ची मिळकत असल्याची बाब वादांकित नाही. वादी यांनी नि.नं.३/३ कडे "दैनिक सकाळ" या वर्तमानपत्राची दिनांक २५/६/२०१८ रोजीच प्रत जोडलेली आहे. सदरच्या वर्तमानपत्रामध्ये वादी यांनी गट नं.३३८ मध्ये त्याचे हक्क व हितसंबंध असल्याचे सदर मिळकतीबाबत कोणतेही हस्तांतरण अथवा तारण गहाण चा व्यवहार करण्यात येवू नये अशाप्रकारे जाहिर नोटीस दिलेली आहे. गट नं.३३८ हया मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान सरस–निरस मानाने वाटप झाल्याचे स्वीकृतदर्शनी दिसून येत नाही. अशी परिस्थिती असताना प्रतिवादी क्रं.१ यानी गट नं. ३३८ मधील ०.२१ आर मिळकतीचे प्रतिवादी क्रं.३ यास खरेदीखत करुन दिलेले आहे. वादी यांनी सदरहू खरेदीखत हे नि.नं.३/२ कडे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांनी सदरचे खरेदीपत्र नाकारलेले नाही. प्रतिवादी यांनी सदरचे दावा मिळकत ही प्रतिवादी यांनी त्याच्या कायदेशीर गरजेकरिता विक्री केलेली असुन गट क्र.३३८ मध्ये क्षेत्र शिल्लक असल्याने प्रस्तुत वादी यांना तक्रार करण्याचा कोणताही अधिकार नाही असे कथन केलेले आहे. वास्तविक वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सरसनिरस मानाने वाटप होत असताना त्याच्या हिश्यास येणारे क्षेत्र हे वाटपा अंती ठरणार आहे. त्याचबरोबर प्रतिवादी क्रं.१ यांनी दावा मिळकतीबाबत करुन दिलेले खरेदीखत हे कायदेशीर आहे किंवा कसे ही बाब ही पुराव्या अंती ठरणार आहे. अशापरिस्थितीत प्रतिवादी क्रं.३ यांनी दावा मिळकतीचे हस्तांतर केल्यास अथवा त्यावर बोजा निर्माण केल्यास नक्कीच त्याचा परिणाम वादी यांच्या हक्कावर होणार आहे. त्याचबरोबर भविष्यात गट नं.३३८ मध्ये वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सरसनिरस मानाने वाटत होत असताना वादी यांना सक्तीचे वाटप घ्यावे लागणार आहे. सबब, सदर सर्व बाबींचा विचार करता जरी प्रतिवादीतर्फे युक्तीवाद करीत असताना प्रतिवादी हे दावा मिळकत

विक्री करणार नाही असे जरी सांगण्यात आलेले असले तरी यदाकदाचित प्रतिवादी क्रं.३ कडून दावा मिळकतीचे हस्तांतरण झाल्यास वादीच्या हक्कास बाधा येवू शकते. याउलट, दावा निकाली लागेपर्यत दावा मिळकती तबदील करू नये असा आदेश पारित केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

**१३.** एकंदरीतच वरील सर्व बाबींचा विचार करता वादींनी सकृतदर्शनी केस सिध्द केली असून सोयीस्करतेची तुलादेखील वादींच्या बाजूने आहे. त्यामुळे दावा मिळकतीबाबत तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे ही बाब सिध्द होते. परिणामी, मुद्दा क्रं.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्र.४ करिता–</u>**

**१४.** एकंदरीत, अर्जातील कथने, पुरावा व प्रचलित कायदयातील तत्वे व गृहितके यांचा विचार करता वादीचा अंतरिम मनाईचा अर्ज खर्चासह मंजूर करणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

१. वादी यांचा नि.५ येथील अंतरिम मनाईचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रं.३ यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकत ही कोणत्याही प्रकारे तबदील करू नये किंवा त्यावर कोणताही बोजा करू नये असा अंतरिम मनाई हुकूम वादीच्या हक्कात देण्यात येतो.

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2019.12.21 00:51:18 +0530

दिनांकः–०५.१२.२०१९.

(**विश्वास पां. शिंदे**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर.